# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. २३ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०८ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

गुरुवार २३ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, सप्तमी रात्री ८-५० पर्यंत नंतर अष्टमी तिथी, दिवस नक्षत्र- पुनर्वसु रात्री ८-५७ पर्यंत नंतर पुष्य, चंद्र रास- मिथुन दुपारी ३-१३ पर्यंत नंतर कर्क, सूर्य रास = मेष, गुरु रास= मिथुन

### कल्पना खरातला दिलासा नाही

**नाशिक:** अशोक खरात प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. राहाता येथील न्यायालयात बुधवारी अशोक खरातची पत्नी कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील युक्तिवाद पूर्ण झाला असून न्यायालयाने तिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. आता कल्पना खरात अटकपूर्व जामीनासाठी हायकोर्टात धाव घेणार का याकडे सर्वांचे लक्ष आहे. कल्पना खरातच्या अटकपूर्व जामीन अर्जावर राहाता न्यायालयात बुधवारी सुनावणी पार पडली.

## सारांश वृत्त

### खंडणी प्रकरणी एकाला अटक

**मेदिनीनगर :** झारखंडच्या पलामू जिल्ह्यात एका जमीन व्यापाऱ्याकडून १.२ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी, अनेक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये हवा असलेल्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. ५५ वर्षीय पीडितेने टाऊन पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे मंगळवारी टाकलेल्या छाप्यात आरोपीला अटक करण्यात आली होती.

### बंगळूर विमानतळावर कोटींचा गाजा जप्त

**बंगळूर :** बँकॉकहून बंगळूरच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यावर एका प्रवाशाला ३.८९ कोटी रुपये किमतीच्या हायड्रोपोनिक गांजासह ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. आरोपीला अमली पदार्थ आणि मानसोपचारविषयक पदार्थ कायद्यान्वये अटक करण्यात आली. बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाला अडवण्यात आले आणि त्याच्या चेक-इन बॅगेजमध्ये लपवलेला ११.११ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला, ज्याची किंमत ३.८९ कोटी रुपये आहे, असे सीमाशुल्क विभागाने म्हटले आहे.

### बंधन बँकेला मिळणार नवीन अध्यक्ष

**कोलकाता :** बंधन बँकेने बुधवारी, २२ एप्रिल रोजी सांगितले की, भारतीय रिझर्व्ह बँकेने देबाशीष पांडा यांच्या बँकेच्या अर्धवेळ अध्यक्षपदी तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्तीला पूर्वमंजुरी दिली आहे. बँकेने म्हटले आहे की आरबीआयने मंजुरी दिली आहे आणि नियामकाने निर्दिष्ट केलेल्या अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून, पांडा पदभार स्वीकारतील त्या तारखेपासून हा कार्यकाळ प्रभावी होईल.

### ममता बॅनर्जी यांच्यावर सर्वोच्च न्यायालयाचे ताशेरे

# तर लोकशाही धोक्यात येईल...!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री केंद्रीय तपास यंत्रणेच्या सुरू असलेल्या तपासात हस्तक्षेप करतात, तेव्हा त्याला केंद्र-राज्यांतील सांविधानिक वाद म्हणता येणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी (दि. २२) पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर ताशेरे ओढले. "तुम्ही कदाचित अमूर्त कायदेशीर तत्त्वांवर आधारित युक्तिवाद करू शकता; परंतु प्रत्यक्षात घडणाऱ्या वास्तवाकडे न्यायालय डोळेझाक करू शकत नाही. एका व्यक्तीने—जी मुख्यमंत्री पदावर आहे—असे कृत्य केल्यास संपूर्ण यंत्रणा आणि लोकशाही धोक्यात येऊ शकते," असे न्यायालयाने नमूद केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी उद्यासाठी निश्चित करण्यात आली आहे. तृणमूल काँग्रेसचे राजकीय सल्लागार असलेल्या आय-पॅकच्या कार्यालयावर अंमलबजावणी संचालनालय (ईडी) यांनी टाकलेल्या छाप्यादरम्यान मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि राज्य पोलिसांनी अडथळा आणल्याचा आरोप ईडीने केला आहे. या प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. ईडीच्या म्हणण्यानुसार, आय-पॅक कार्यालयावर छापा टाकताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी वरिष्ठ नेत्यांसह घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी अधिकाऱ्यांना धमकावले तसेच काही फाईल्स आणि डिजिटल उपकरणे तेथून नेल्याचा आरोप आहे. यामुळे तपासात अडथळा निर्माण झाल्याचे ईडीने न्यायालयात नमूद केले. उलट राज्य पोलिसांनी ईडी अधिकाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल केल्याची बाबही समोर आली आहे.

जानेवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ईडी अधिकाऱ्यांवरील कारवाईला स्थगिती दिली होती आणि संबंधित दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याचे निर्देश राज्याला दिले होते. सुनावणीदरम्यान राज्याच्या वतीने ज्येष्ठ वकील मेनका गुरुस्वामी यांनी हा मुद्दा केंद्र-राज्य वादाचा असल्याचे सांगत, खटला कलम ३२ ऐवजी कलम १३१ अंतर्गत दाखल व्हायला हवा होता, असा युक्तिवाद केला. यावर न्यायमूर्ती मिश्रा यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत विचारले, "यामध्ये राज्याचा कोणता अधिकार बाधित झाला आहे? हा केंद्र विरुद्ध राज्य असा वाद नाही. कोणत्याही राज्याचे मुख्यमंत्री तपास सुरू असताना त्या ठिकाणी कसे जाऊ शकतात? एखादे मंत्री तपासात हस्तक्षेप करून लोकशाही धोक्यात आणत असतील, तर त्याला केंद्र-राज्य वाद म्हणायचे का?" सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी छाप्याच्या ठिकाणाहून काही महत्त्वाचे पुरावे आणि कागदपत्रेही सोबत नेली. यावर खंडपीठाने पुन्हा एकदा स्पष्ट शब्दांत नमूद केले की, "अशा प्रकारचे कृत्य संपूर्ण व्यवस्थेसाठी घातक ठरू शकते आणि लोकशाहीवरही त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो."

## द्रुतगती मार्गावर दोन दिवस दुपारी वाहतूक बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. डोंगरगाव-कुसगाव परिसरात पुलाच्या शटरिंग काढण्याचे आणि रंगकामाचे काम हाती घेण्यात आल्याने दोन दिवस दुपारच्या वेळेत वाहतूक पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांनी घेतला आहे.

या निर्णयानुसार गुरुवार, २३ एप्रिल रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत मुंबईकडे जाणारी सर्व वाहतूक बंद राहणार असून, शुक्रवारी २४ एप्रिल रोजी याच वेळेत पुण्याकडे येणारी वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात येणार आहे. या कालावधीत एक्सप्रेसवेवरील सर्व वाहने पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहेत. मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांना किवळे-देहूरोड-तळेगाव मार्गे राष्ट्रीय महामार्ग 48 वरून कुसगाव टोल प्लाझाकडे वळवण्यात येईल, तर पुण्याकडे येणारी वाहने कुसगाव टोल प्लाझामार्गे देहूरोड-किवळे मार्गाने पुण्याकडे सोडण्यात येतील.

पुलाच्या कामासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेतल्याचे एमएसआरडीसीकडून स्पष्ट करण्यात आले असून, या काळात वाहनचालकांनी प्रवासाचे योग्य नियोजन करावे आणि दिलेल्या वेळेत शक्यतो एक्सप्रेसवे टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, कोणतीही अडचण आल्यास नियंत्रण कक्षाचा ९८२२४९८२२४ किंवा महामार्ग पोलिसांचा ९८३३४९८३३४ या क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहितीही देण्यात आली आहे.

## बारामती विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज गुरूवारी मतदान होणार असून, त्यासाठी आवश्यक मतदान साहित्य व कर्मचारी संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम, एमआयडीसी, बारामती येथून ही प्रक्रिया सुरळीत पार पडली.

या अंतर्गत ४७८ मतदान केंद्रांसाठी ४७८ ईव्हीएम, ८५६ बॅलेट युनिट्स तसेच ४७८ व्हीव्हीपॅट यंत्रे ६० बंदिस्त मिनी टेम्पोद्वारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरक्षितपणे मतदान केंद्रांवर पोहोचविण्यात आली. यंदा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरण प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे.

तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल रावडे यांनी सांगितले की, यापूर्वीप्रमाणे मतदान पथकांना डिस्पॅच सेंटरवर न बोलावता थेट त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ईव्हीएम यंत्रांसह लिफाफे, फॉर्म्स आणि इतर आवश्यक साहित्य थेट मतदान केंद्रांवर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी संपूर्ण मतदारसंघ ६० झोनमध्ये विभागण्यात आला असून प्रत्येक झोनसाठी एक क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. एकूण ६० क्षेत्रीय अधिकारी असून प्रत्येक अधिकाऱ्याकडे सुमारे ८ ते १० मतदान केंद्रांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

### सरकार ॲक्शन मोडमध्ये; तीन दिवसांत मसुदा जाहीर

# देवस्थान इनाम जमिनींच्या हस्तांतरणासाठी कायदा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील देवस्थान इनाम जमिनींचा दीर्घकालीन प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकार ॲक्शन मोडमध्ये आले असून, यासंदर्भातील कायद्याचा मसुदा पुढील तीन दिवसांत सार्वजनिक केला जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. २२ एप्रिल) ही माहिती दिली. मुंबईत पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले की, जुलै अधिवेशनात याबाबतचा कायदा सादर करण्याचा सरकारचा मानस आहे.

देवस्थान इनाम जमिनींबाबतचा प्रस्तावित कायद्याचा मसुदा सरकारी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यावर नागरिकांकडून हरकती आणि सूचना मागवण्यात येतील. या प्रक्रियेनंतर संबंधित देवस्थान, कुळधारक आणि वहिवाटदार यांचे हक्क स्पष्ट करणारा सुटसुटीत कायदा अंतिम करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुमारे एका महिन्याच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या सूचना आणि हरकतींचा विचार करून अंतिम मसुदा तयार केला जाईल.

राज्यात अनेक ठिकाणी देवस्थान इनाम जमिनी कुळधारक किंवा वहिवाटदारांच्या नावावर असल्या, तरी कायदेशीर अडचणींमुळे त्यांचे हस्तांतरण शक्य होत नाही. त्यामुळे विकासकामे रखडली असून शेतकऱ्यांनाही त्यांच्या जमिनींचा पूर्णपणे वापर करता येत नसल्याचे चित्र आहे. विशेषतः कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे ४.५ लाख हेक्टर जमीन या समस्येत अडकलेली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हा कायदा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याआधी काही ठिकाणी देवस्थान इनाम जमिनींचे परस्पर व्यवहार झाले असल्याने, त्या पार्श्वभूमीवर शेतकरी, वहिवाटदार आणि देवस्थान यांचे हित लक्षात घेऊन स्पष्ट धोरण निश्चित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर सरकार व्यापक कायदा आणि नियमावली तयार करत असून, सर्व संबंधित घटकांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी मसुदा एक महिना खुला ठेवला जाणार आहे. त्यानंतर अंतिम कायदा जुलै अधिवेशनात मांडण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी नमूद केले.

### आयोगाकडून मल्लिकार्जुन खर्गे यांना नोटीस

# मोदींना दहशतवादी म्हणणे महागात पडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधानांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याविरोधात केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी गंभीर दखल घेत कारण दाखवा नोटीस बजावली आहे. या प्रकरणामुळे देशातील राजकीय वातावरण तापले असून सत्ताधारी भाजप आणि काँग्रेस आमनेसामने आले आहेत.

भाजपाच्या शिष्टमंडळाने, ज्यामध्ये केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासह तीन केंद्रीय मंत्र्यांचा समावेश होता, निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करत खरगे यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर आयोगाने ही नोटीस जारी केली.

मंगळवारी चेन्नई येथे पत्रकारांशी बोलताना खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'दहशतवादी' असा केल्याने मोठा वाद निर्माण झाला. अण्णा द्रमुकने भाजपसोबत हातमिळवणी केल्याबद्दल टीका करताना त्यांनी हे वक्तव्य केले होते. या विधानानंतर भाजपने तीव्र प्रतिक्रिया देत, हा केवळ पंतप्रधानांचा नव्हे तर देशातील १४० कोटी नागरिकांचा अपमान असल्याचा आरोप केला. खर्गे यांनी आपल्या वक्तव्यात म्हटले होते, "जे लोक अण्णादुराईंचा फोटो लावतात, ते मोदींसोबत कसे जाऊ शकतात? ते एक दहशतवादी आहेत. त्यांचा पक्ष समता आणि न्यायावर विश्वास ठेवत नाही." तसेच त्यांनी तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन यांच्यासारख्या नेतृत्वाची गरज असल्याचे सांगत अण्णा द्रमुकवरही टीका केली. वाद वाढल्यानंतर खर्गे यांनी स्पष्टीकरण देत आपल्या वक्तव्याचा हेतू वेगळा असल्याचे सांगितले. "मी पंतप्रधानांना थेट दहशतवादी म्हटलेले नाही. माझा उद्देश त्यांच्या 'धमकावण्याच्या राजकारणा'कडे लक्ष वेधण्याचा होता," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी पुढे ईडी, आयटी आणि सीबीआय सारख्या संस्थांचा उल्लेख करत राजकीय दबावाचा आरोपही केला. या प्रकरणामुळे निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर राजकीय भाषणांच्या मर्यादांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, निवडणूक आयोगाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गवईंची बागेश्वर धामला सहकुटुंब भेट

**नवी दिल्ली :** भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मध्यप्रदेशातील प्रसिद्ध आणि तितक्याच वादग्रस्त बागेश्वर धामला सहकुटुंब भेट दिली आहे. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गवई यांनी पत्नी तेजस्विनी आणि मुलगा ज्योतिरादित्य यांच्यासह बागेश्वर बालाजीचे दर्शन घेऊन धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा आशीर्वाद घेतला. गवई कुटुंबाने बागेश्वर धामवर विधिवत पूजन करून देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याशी धार्मिक आणि सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा केली.

# रोहित पवार यांची निर्दोष मुक्तता

### राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (एमएससीबी) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांना विशेष सत्र न्यायालयाने दोषमुक्त केले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दीर्घकाळ चर्चेत असलेल्या या प्रकरणाला मोठा दिलासा मिळाला असून, संबंधित गुन्ह्याला प्रभावीपणे पूर्णविराम मिळाल्याचे मानले जात आहे.

या प्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास आधीच बंद करण्यात आला होता. आर्थिक गुन्हे शाखेने सादर केलेला 'क्लोजर रिपोर्ट' विशेष न्यायालयाने स्वीकारल्यानंतर, त्याच आधारे सक्तवसुली संचालनालय (ईडी) कडून दाखल करण्यात आलेले प्रकरण टिकू शकत नाही, असा युक्तिवाद करत रोहित पवार यांनी न्यायालयात दोषमुक्तीचा अर्ज दाखल केला होता. आपल्या विरोधातील आरोप निराधार असून खटला चालवण्यास कायदेशीर आधार नाही, असे त्यांनी अर्जात नमूद केले होते. या प्रकरणात रोहित पवार यांच्यासह त्यांचे सहकारी राजेंद्र इंगवले आणि अन्य पाच आरोपींनीही दोषमुक्तीची मागणी केली होती. ईडीने मात्र न्यायालयाने या अर्जावर गुणवत्तेच्या आधारे निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली होती. खासदार-आमदारांच्या प्रकरणांसाठी स्थापन विशेष न्यायालयाचे न्यायाधीश महेश जाधव यांनी सर्व बाजूंचा विचार करून संबंधित सर्व आरोपींना दोषमुक्त करण्याचा निर्णय दिला.

यापूर्वी न्यायालयाने ईडीच्या आरोपपत्राची दखल घेत कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या लिलाव प्रक्रियेत रोहित पवार सहभागी असल्याचे सकृतदर्शनी दिसत असल्याचेही न्यायालयाने नमूद केले होते.

### उच्चाधिकार समितीचा अहवाल सरकारकडे

# शेतकरी कर्जमाफीला मिळणार लवकरच गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात महत्त्वाची घडामोड घडली असून, प्रक्रियेला आता वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. कर्जमाफीसाठी गठित उच्चाधिकार समितीने आपला सविस्तर अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. समितीचे अध्यक्ष प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. सरकारकडून या अहवालाची सखोल छाननी केली जाणार असून, त्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अहवालात शेतकऱ्यांना थकीत कर्जातून मुक्त करण्याबरोबरच त्यांच्या आर्थिक स्थितीत शाश्वत सुधारणा घडवण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश करण्यात आला आहे. दरम्यान, अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना'बाबतही चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. याशिवाय, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे प्रामाणिक कर्जदारांनाही दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राहुरी येथील सभेत बोलताना सांगितले की, "समितीचा अहवाल सरकारकडे आला आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच कर्जमाफीची अंमलबजावणी करण्याचा आमचा प्रयत्न असेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे कर्जफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी सरकार कटिबद्ध आहे." याच पार्श्वभूमीवर कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, ३० जून ही अंतिम मुदत असली तरी त्यापूर्वीच काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे स्पष्ट केले.

राज्यातील शेतकऱ्यांवरील वाढते कर्जबाजारीपण हे गंभीर स्वरूप धारण करत असून, अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तज्ज्ञांच्या मते, केवळ कर्जमाफी हा उपाय नसून शेतीत संरचनात्मक बदल आवश्यक आहेत. या पार्श्वभूमीवरच सरकारने उच्चाधिकार समितीची स्थापना केली होती. यापूर्वीही राज्यात 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना' (२०१७) आणि 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' (२०१९) राबवण्यात आल्या होत्या. त्या माध्यमातून काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी कर्जमाफीचा प्रश्न अद्याप कायम आहे. नव्या अहवालात उत्पादन खर्च कमी करणे, बाजारपेठेतील स्थैर्य, पिकविमा सुधारणा आणि शाश्वत उत्पन्नाचे स्रोत निर्माण करणे यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती आहे. समितीचा अहवाल आणि सरकारची भूमिका लक्षात घेता, येत्या काही दिवसांत कर्जमाफीबाबत ठोस निर्णय होण्याची शक्यता असून खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## इंधनदरवाढीचा विमान कंपनीला फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका-इराण संघर्षामुळे जागतिक स्तरावर इंधनाच्या किमतीत मोठी वाढ झाली असून त्याचा थेट परिणाम विमान वाहतूक क्षेत्रावर दिसू लागला आहे. या पार्श्वभूमीवर युरोपातील आघाडीचा विमान वाहतूक समूह लुफ्थांसा समूहाने मोठा निर्णय घेत, यंदाच्या उन्हाळ्यात जवळपास २० हजार कमी अंतराची उड्डाणे रद्द करण्याची घोषणा केली आहे.

विमान इंधनाच्या दरात झालेल्या तीव्र वाढीमुळे खर्च नियंत्रित ठेवणे आणि कार्यक्षमता वाढवणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे एकूण क्षमतेत १ टक्क्यांपेक्षा कमी घट होणार असली, तरी आर्थिक बचतीच्या दृष्टीने तो महत्त्वाचा ठरणार आहे. कंपनीच्या अंदाजानुसार, ऑक्टोबरपर्यंत सुमारे ४० हजार मेट्रिक टनांहून अधिक जेट इंधनाची बचत होण्याची शक्यता आहे.

अमेरिका-इराण तणाव वाढल्यानंतर जेट इंधनाचे दर जवळपास दुपटीने वाढले आहेत. विमान कंपन्यांच्या एकूण खर्चात इंधनाचा सर्वाधिक वाटा असल्याने अनेक कमी अंतरावरील उड्डाणे तोट्यात जाऊ लागली आहेत. परिणामी, अशा मार्गांवरील उड्डाणे बंद किंवा कमी करण्याचा निर्णय कंपनीला घ्यावा लागला आहे.

विशेषतः फ्रँकफर्ट आणि म्युनिक या प्रमुख केंद्रांवरून होणाऱ्या उड्डाणांमध्ये कपात करण्यात येत आहे. मात्र, ही कपात जागतिक उपस्थिती कमी करण्यासाठी नसून ऑपरेशनल कार्यक्षमता सुधारण्यासाठी असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

## संपादकीय


# अनिश्चिततेचे सावट



**जागतिक राजकारणाच्या क्षितिजावर साचलेली युद्धाची ढगं आणि आर्थिक अस्थिरतेची वादळं पाहता, भारताला आता केवळ सुदिनांच्या स्वप्नांत रमून चालणार नाही. जगाच्या या अनिश्चित महासागरात स्वतःची नौका वाचवण्यासाठी 'सर्वात वाईट' परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी ठेवणे, हाच आता एकमेव पर्याय आहे.**

जागतिक भू-राजकारणाचा सारीपाट सध्या अशा वळणावर आहे, जिथे 'स्थैर्य' हा शब्द शब्दकोशातून हद्दपार व्हावा की काय, अशी भीती वाटू लागली आहे. युक्रेनमध्ये रशियाने खेचलेले युद्ध असो, पश्चिम आशियातील इस्त्रायल-इराण संघर्षाचा धगधगता ज्वालामुखी असो, वा दक्षिण चीन समुद्रातील चीनची वाढती मुजोरी—या सर्व घडामोडी भारतासाठी केवळ 'दूरच्या बातम्या' उरलेल्या नाहीत. भारत आज अशा एका जगात उभा आहे जिथे भविष्यासाठी 'प्लॅन ए' आखण्यापेक्षा 'प्लॅन झेड' म्हणजेच सर्वात वाईट परिस्थितीसाठी सज्ज राहणे, ही काळाची गरज बनली आहे. शेजारच्या घरात आग लागलेली असते आणि वारे आपल्या दिशेने वाहत असतात, तेव्हा 'आमचे घर फायरप्रूफ आहे' या भ्रमात राहणे हे आत्मघातकी ठरू शकते. गेल्या दशकात भारताने स्वतःला 'विश्वगुरू' किंवा जागतिक मध्यस्थ म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असला, तरी जागतिक वास्तव हे प्रतिमेपेक्षा कितीतरी अधिक क्रूर आहे. रशिया-चीन यांची वाढती जवळीक ही भारताच्या जुन्या सामरिक समीकरणांना सुरुंग लावणारी आहे. एकेकाळी रशिया हा भारताचा हक्काचा मित्र होता, पण आज तो बीजिंगच्या आर्थिक आणि लष्करी वर्चस्वाखाली दबलेला आहे. अशा स्थितीत, उद्या जर सीमेवर चीनने आगळीक केली, तर रशिया तटस्थ राहील की चीनची बाजू घेईल, हा प्रश्न आता केवळ चर्चासत्रांचा राहिलेला नाही. भारताला आपली 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' (सामरिक स्वायत्तता) जपतानाच, आता कोणावरही अंधळेपणाने विसंबून राहणे परवडणारे नाही. आर्थिक आघाडीवरही परिस्थिती 'आलबेल' नाही. जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होणे आणि कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी अनपेक्षित वाढ, हे भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी कोणत्याही क्षणी 'ब्लॅक स्वॅन' इव्हेंट ठरू शकतात. आपण पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेची स्वप्ने पाहत असताना, जगातील मोठ्या सत्तांमध्ये सुरू असलेले 'ट्रेड वॉर' आपल्या निर्यातीला खिळ घालू शकते. अशा वेळी भारताने केवळ विदेशी गुंतवणुकीवर अवलंबून न राहता, आपली अंतर्गत बाजारपेठ आणि स्वदेशी उत्पादन क्षमता इतकी भक्कम करणे गरजेचे आहे की, जागतिक धक्क्यांनी आपल्या पायाखालची जमीन सरकू नये. येथे कळीचा मुद्दा आहे तो म्हणजे 'लष्करी आधुनिकीकरण'. आपण अजूनही शस्त्रास्त्रांच्या आयातीसाठी जगातील आघाडीचे देश आहोत. युद्धाचे स्वरूप आता बदलले आहे; ते आता केवळ रणगाडे आणि विमानांपुरते मर्यादित नसून 'सायबर वॉरफेअर' आणि 'ड्रोन तंत्रज्ञाना'कडे वळले आहे. चीनने या क्षेत्रात घेतलेली झेप पाहता, भारत अजूनही नोकरशाहीच्या लाल फितीत अडकलेला दिसतो. 'मेक इन इंडिया' अंतर्गत संरक्षण उत्पादनांना वेग देणे, ही आता केवळ घोषणा न राहता ती एक 'मिशन मोड'वर राबवायची मोहीम असायला हवी. सर्वात वाईट परिस्थिती म्हणजे एकाच वेळी दोन आघाड्यांवर युद्ध लढण्याची वेळ येणे. या परिस्थितीसाठी आपली सज्जता किती? या प्रश्नाचे उत्तर शोधताना कोणाचेही समाधान होईल अशी परिस्थिती आज तरी नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणाने आतापर्यंत 'बॅलन्सिंग ॲक्ट' (तोल सांभाळण्याचे काम) उत्तम केले आहे. अमेरिकेशी जवळीक साधताना रशियाशी संबंध टिकवणे आणि क्वाडचा भाग असताना ब्रिक्स मध्येही राहणे, हे मुत्सद्देगिरीचे लक्षण असले तरी, जागतिक ध्रुवीकरण जेव्हा टोकाला जाते, तेव्हा 'तटस्थता' ही 'दुबळेपणा' मानली जाऊ लागते. भारताला आता आपली भूमिका अधिक स्पष्ट आणि कणखर करावी लागेल. विशेषतः 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व करताना, आपल्याला आपल्या स्वतःच्या सुरक्षेच्या गरजांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. 'प्लॅनिंग फॉर द वर्स्ट' म्हणजे नकारात्मक विचार करणे नव्हे, तर ते पराकोटीचे वास्तववाद आहे. जो देश संकटाच्या पदघोषणा आधीच ऐकू शकतो, तोच देश संकटात टिकून राहतो. भारताला आता आपल्या धोरणांमध्ये 'लवचिकता' आणि 'स्वयंमपूर्णता' या दोन शब्दांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. जागतिक व्यवस्थेचा जो डोलारा दुसऱ्या महायुद्धानंतर उभा राहिला होता, तो आता कोसळण्याच्या मार्गावर आहे. या कोसळणाऱ्या ढिगाऱ्याखाली आपण दबले जाऊ नये, यासाठी स्वतःचा 'सेफ्टी नेट' तयार करणे, हाच आता भारतासाठीचा एकमेव सन्मानजनक मार्ग आहे. कयामतची चाहूल लागण्यापूर्वीच आपली नौका किनारयाला लावण्याची तयारी करणे, हेच शहाणपणाचे लक्षण ठरेल.

# लोकशाहीचा 'मूक' नायक आणि संहितेचा संकोच




> » निवडणुकीच्या धामधुमीत शब्दांची मर्यादा सुटणे हे नवे नाही, पण जेव्हा देशाचे सर्वोच्च नेतृत्वच आचारसंहितेच्या सीमारेषेवर उभे राहते, तेव्हा घटनात्मक संस्थांचे 'मौन' हे अधिक भयावह वाटते.

भारतीय लोकशाहीचे सर्वात मोठे उत्सव म्हणजे निवडणुका. पण या उत्सवाचा पोत अलीकडच्या काळात ज्या प्रकारे विरळ होत चालला आहे, ते पाहता 'निवडणूक' ही केवळ आकड्यांची आणि ध्रुवीकरणाची जुगलबंदी उरली आहे की काय, अशी रास्त शंका येते. हा मुद्दा आहे तो या देशातील घटनात्मक संस्थांच्या 'कण्या'चा आणि त्यांच्या निष्पक्षपातीपणाचा. कुंपणच शेत खाऊ लागते, तेव्हा तक्रार कोणाकडे करायची, हा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे हाच लोकशाहीचा सर्वात मोठा पराभव असतो.

पंतप्रधानांचे पद हे केवळ एका राजकीय पक्षाचे नसते, तर ते संपूर्ण देशाचे आणि त्यातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधित्व करत असते. अशा पदावर बसलेल्या व्यक्तीने जेव्हा निवडणुकीच्या प्रचारात विशिष्ट समुदायाला लक्ष्य करणारी किंवा भीती निर्माण करणारी भाषा वापरली, तेव्हा ती केवळ आचारसंहितेचे उल्लंघन नसते, तर ती या देशाच्या सामाजिक वीणीला कात्री लावण्याचा प्रयत्न असतो. 'इनव्हिडियस स्पीच' (द्वेषमूलक भाषण) हे लोकशाहीच्या मुळावर येणारे विष आहे. पण दुर्दैव असे की, ज्या निवडणूक आयोगाकडे या विषावर उतारा शोधण्याची जबाबदारी आहे, तो आयोग सध्या 'विश्रांती'च्या मुडमध्ये दिसत आहे.

निवडणूक आयोगाची स्वायत्तता हा भारतीय लोकशाहीचा कणा मानला जातो. टी. एन. शेषन यांच्यासारख्या आयुक्तांनी ज्या आयोगाचा दरारा निर्माण केला होता, त्याच आयोगाला आज नोटीस पाठवतानाही 'कोणाचे नाव घ्यावे' याचे भान ठेवावे लागते, हीच मोठी शोकांतिका आहे. पंतप्रधानांच्या भाषणाबाबत तक्रारी आल्यानंतर आयोगाने थेट त्यांना नोटीस न पाठवता पक्षप्रमुखांना (भाजप अध्यक्ष) पत्र पाठवणे, हा प्रकार म्हणजे 'साप सोडून भुई धोपटण्या'सारखा आहे. ही 'अप्रत्यक्ष' कार्यपद्धती आयोगाच्या निष्पक्षपातीपणावर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. जर नियमावली सर्वांसाठी सारखी असेल, तर कारवाईचा दंडगा केवळ विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच का चालतो?

या राजकारणामागे असलेला मूळ उद्देश म्हणजे 'नॅरेटिव्ह' सेट करणे. जेव्हा विकास, रोजगार आणि अर्थव्यवस्थेच्या मुद्द्यांवरून लक्ष भरकटवायचे असते, तेव्हा 'धार्मिक ध्रुवीकरण' हे सर्वात सोपे शस्त्र ठरते. ट्रम्प यांच्या अमेरिकेत जे घडले, त्याचीच एक आवृत्ती आपण इथे पाहतो आहोत का? जिथे भीती ही मतदानाचा मुख्य आधार बनते. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात संपत्तीच्या वाटपाबाबत किंवा विशिष्ट समुदायाबाबत जे दावे केले, ते तथ्यात्मक पेक्षा राजकीय अधिक होते. पण जेव्हा हे दावे सर्वोच्च स्तरावरून केले जातात, तेव्हा त्याची तीव्रता अधिक असते आणि त्याचे परिणाम सामाजिक सौहार्दावर दीर्घकाळ टिकणारे असतात.

येथे कळीचा मुद्दा हा आहे की, आपण संस्थात्मक ऱ्हासाच्या कोणत्या टप्प्यावर उभे आहोत? जर निवडणूक आयोग, ज्याला निवडणुकांचे 'रेफ्री' मानले जाते, तोच जर एका बाजूला झुकताना दिसला, तर खेळाच्या मैदानात 'फेअर प्ले'ची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. आचारसंहिता ही केवळ कागदावरच्या नियमावलीसाठी नसते, तर ती निवडणुकीच्या प्रक्रियेत एक 'लेव्हल प्लेइंग फील्ड' (सर्वांना समान संधी) निर्माण करण्यासाठी असते. पण आज ही संहिता केवळ सोयीनुसार वापरली जाणारी एक 'सॉफ्ट गाईडलाईन' बनली आहे.

कुठल्याही सशक्त लोकशाहीत विरोधाचा आवाज जेवढा महत्त्वाचा असतो, तेवढीच सत्तेत बसलेल्यांची जबाबदारीही मोठी असते. पण सध्या 'सत्तेचा माज' आणि 'विद्यमानतेचा फायदा' यातून निर्माण झालेली ही आक्रमकता लोकशाहीच्या तत्त्वांना हरताळ फासणारी आहे. निवडणूक आयोगाला हे लक्षात घ्यावे लागेल की, त्यांची उत्तरदायित्व हे सरकारशी नसून या देशाच्या संविधानाशी आहे. जर त्यांनी वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर येणाऱ्या काळात 'निवडणूक' ही केवळ एक फार्स ठरेल आणि आयोगाची ओळख ही केवळ सरकारचा एक विभाग म्हणून शिल्लक राहील.

लोकशाही ही निवडणुका जिंकण्यापुरती मर्यादित नसते. ती जिंकण्याची पद्धत आणि त्या प्रक्रियेतील पारदर्शकता यावर अवलंबून असते. पंतप्रधानांचे भाषण आणि आयोगाचे मौन हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, ज्या लोकशाहीच्या भविष्यासाठी धोक्याची घंटा वाजवत आहेत. 'संहितेचा संकोच' जेव्हा सत्तेच्या हव्यासापोटी होतो, तेव्हा सामान्य माणसाचा लोकशाहीवरचा विश्वास उडू लागतो. आणि तो विश्वास उडणे, हाच खऱ्या अर्थाने या व्यवस्थेचा 'कयामत'चा क्षण असेल.

# ५२ कोटींचा घोटाळा; अहवाल सादर

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कथित ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी नेमलेल्या पाच सदस्यीय चौकशी समितीने अखेर आपला अहवाल मंगळवारी (दि. २१) आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे सादर केला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांच्या भूमिकेबाबत समितीने नेमकी कोणती शिफारस केली आहे, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेतील विविध विकासकामांच्या बिलांच्या देयकांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप असून, प्रवीण जैन यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्थापत्य, बीआरटीएस आदी विभागांतील ७० हून अधिक कामांची बिले सुमारे २० ठेकेदारांना ३० मार्चच्या रात्रीत अदा केल्याचे समोर आले आहे.

ही प्रक्रिया महापालिका अधिनियम १९४९ मधील वित्तीय शिस्त, अंदाजपत्रकीय नियंत्रण आणि अधिकृत मंजुरीच्या तरतुदींना छेद देणारी असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी पुराव्यासह तक्रार केल्यानंतर आयुक्तांनी ९ एप्रिल रोजी पाच सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम (अध्यक्ष), तृप्ती सांडभोर, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, सहआयुक्त मनोज लोणकर आणि मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांचा समितीत समावेश होता. चौकशीदरम्यान कोणताही दबाव येऊ नये म्हणून १० एप्रिल रोजी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते. समितीने लेखा विभागातील कागदपत्रांची तपासणी करून सखोल चौकशी केली असून, प्राथमिक माहितीनुसार जैन यांनी नियमबाह्य पद्धतीने व्यवहार केल्याचे स्पष्ट झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, महापालिकेच्या तिजोरीशी संबंधित विभागातूनच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून आर्थिक शिस्त प्रस्थापित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

सध्या सादर करण्यात आलेला अहवाल हा केवळ ५२ कोटी रुपयांच्या व्यवहारांपुरता मर्यादित असल्याचे सांगितले जात असून, मागील तीन वर्षांतील सर्व व्यवहारांची चौकशी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी दोषींवर नेमकी कोणती कारवाई करतात, याकडे महापालिका वर्तुळासह संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेत संथगती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे आरटीई प्रवेश प्रक्रिया गेल्या आठ दिवसांपासून अत्यंत संथगतीने सुरू असून, आतापर्यंत ३० टक्के अर्जांचीच पडताळणी पूर्ण झाल्याचे समोर आले आहे. दोन केंद्रांवर मिळून फक्त १ हजार १९४ अर्जांची तपासणी पूर्ण झाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

आकुर्डी येथील कै. फकीरभाई पानसरे उर्दू शाळा तसेच पिंपरीतील कर्मवीर भाऊराव पाटील केंद्रावर कागदपत्र पडताळणीदरम्यान मोठा गोंधळ उडाल्याचे चित्र सोमवारी (ता. २०) पाहायला मिळाले. पडताळणी समितीकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

कागदपत्र पडताळणीसाठी शेकडो पालक शाळांमध्ये जमा झाले होते. शहरातील तापमानाचा पारा वाढलेला असताना पालकांना उन्हात ताटकळत उभे राहावे लागल्याने संताप व्यक्त करण्यात आला. अधिकारी केंद्रांवर येत असले तरी पालकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता निघून जात असल्याची तक्रार करण्यात येत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आकुर्डी केंद्र येथे एकूण जागा २६६८ असून केवळ ७९४ अर्जांची पडताळणी पूर्ण झाली आहे, तर पिंपरी केंद्र येथे १३२० जागा असून, ४०० अर्जांची पडताळणी पूर्ण झाली आहे. दोन्ही केंद्रांवर मिळून अपेक्षेपेक्षा खूपच कमी अर्जांची पडताळणी झाल्याचे स्पष्ट होत आहे.

# पीएमआरडीएकडून सर्वांसाठी घरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेअंतर्गत परवडणाऱ्या घरांच्या उभारणीला गती दिली असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घर उपलब्ध करून देण्यात आघाडी घेतली आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तब्बल ३,३१७ घरे वितरित करत पीएमआरडीएने सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार केले आहे.

सन २०२१ पासून सुरू असलेल्या या गृहप्रकल्पांतर्गत ८ एप्रिल रोजी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील सोडत काढण्यात आली होती. या टप्प्यात पेठ क्रमांक १२ व ३०-३२ मधील एकूण १,०२९ घरांचा समावेश होता. आता दुसऱ्या टप्प्यात सेक्टर १२, फेज १ आणि ३१-३२ या भागांमध्ये ईडब्ल्यूएससाठी ४,८८२ आणि अल्प उत्पन्न गटासाठी (एलआयजी) १,५६५ घरांचे नियोजन करण्यात आले आहे. पेठ क्रमांक १२ टप्पा २ अंतर्गत ६,४५२ सदनिकांच्या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून, सुमारे ८२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पात ईडब्ल्यूएस 'ए' प्रकारातील ३,३२० व 'बी' प्रकारातील ३३२ सदनिका, तसेच एलआयजी 'ए' गटातील १,४५६ आणि 'बी' गटातील १,३४४ सदनिकांचा समावेश आहे.

या महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्पासाठी ७२८.९६ कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली असून, एकूण १,१०२ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

# विषयपत्रिकेविना १,१०० कोटींच्या उपसूचना मंजूर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावर तब्बल १ हजार १०० कोटी रुपयांच्या उपसूचना मंजूर केल्याची घोषणा महापौर रवी लांडगे यांनी केल्याने महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, संबंधित सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर अर्थसंकल्प किंवा उपसूचनांबाबत एकही विषय नसताना ही घोषणा करण्यात आल्याने गंभीर शंका उपस्थित होत आहेत.

सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेसमोर एकूण १५ विषय नियोजित होते. मात्र, ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहिल्यानंतर सभा तहकूब करण्यात आली. तसेच




संसदेत 'नारी शक्ती वंदन' विधेयक मंजूर न झाल्याच्या पार्श्वभूमीवर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना नगरसेवकांनी काँग्रेस व मित्रपक्षांविरोधात निषेध नोंदवला.

सभागृहात कोणताही विषय चर्चेला न येताच सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी सभा तहकूब करण्याचा प्रस्ताव मांडला, ज्यास नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर महापौर रवी लांडगे यांनी सभा तहकूब करताना मागील सभेचे इतिवृत्त मंजूर झाल्याचे जाहीर केले.

याच वेळी, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पास दिलेल्या सर्व उपसूचना ग्राह्य व अग्राह्य धरत सुधारित अर्थसंकल्प मंजूर करण्यात आल्याचेही त्यांनी घोषित केले. मात्र, विषयपत्रिकेवर अर्थसंकल्पासंदर्भात कोणताही मुद्दा नसताना, तसेच कोणत्याही नगरसेवकाने या संदर्भात चर्चा किंवा मतप्रदर्शन न करता इतक्या मोठ्या रकमेच्या उपसूचना मंजूर झाल्याची घोषणा केल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे ही प्रक्रिया नियमबाह्य असून, उपसूचनांच्या माध्यमातून झालेला संभाव्य आर्थिक गैरप्रकार दडवण्याचा प्रयत्न तर नाही ना, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, १ हजार १०० कोटी रुपयांच्या उपसूचनांच्या मंजुरीमुळे महापालिकेच्या अर्थकारणावर मोठा परिणाम होणार असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. महापौरांच्या निर्णयामागील नेमके कारण आणि प्रक्रिया स्पष्ट करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# एमबीबीएस प्रवेशाच्या आमिषाने ५ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** एमबीबीएस प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवत जुळ्या मुलींच्या पालकांची तब्बल ५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी एड्युव्हिओ लर्निंग सोल्युशन्स कंपनीच्या काऊन्सलर व संचालकांविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात काऊन्सलर रोनित सर तसेच कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरगटपा अरविंदराव ऊर्फ आदित्य कुमार ऊर्फ आदित्य देशमुख यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत मुर्तिजापूर येथील ५१ वर्षीय पालकांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या जुळ्या मुलींनी बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर एमबीबीएस प्रवेशासाठी त्यांनी पुण्यातील रोनित यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना हैदराबादस्थित एड्युव्हिओ लर्निंग सोल्युशन्स प्रा. लि. या शिक्षण सल्लागार संस्थेबाबत माहिती देण्यात आली.

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन देत प्रत्येकी अडीच लाख रुपये, असे एकूण ५ लाख रुपये एचडीएफसी बँकेतील कंपनीच्या खात्यात भरण्यास सांगितले. त्यानुसार २९ डिसेंबर २०२५ रोजी ही रक्कम जमा करण्यात आली. मात्र, त्यानंतर प्रवेशाबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आली नाही. ५ मार्च २०२६ रोजी चौकशी केली असता संबंधित काऊन्सलरकडून टाळाटाळ करण्यात आली.

कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून देशभरातील अनेक पालकांची फसवणूक झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच हैदराबाद येथील पेट बशीराबाद पोलीस ठाण्यात अशाच प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे समजताच फिर्यादींना आपलीही फसवणूक झाल्याचे लक्षात आले. पैसे परत करण्याचे आश्वासन देऊनही रक्कम न परत केल्याने त्यांनी सुरुवातीला मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर हा गुन्हा विमानतळ पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

दरम्यान, एड्युव्हिओ कंपनीविरुद्ध यापूर्वीही देशातील विविध राज्यांमध्ये एमबीबीएस प्रवेशाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे आरोप असून, या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

**तडीपार गुंडाला वानवडीतून अटक**

**पुणे :** पुणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने वानवडी परिसरात एका तडीपार गुंडाला बेड्या ठोकल्या आहेत. प्रथमेश चंद्रकांत रासगे (वय २३, रा. सोलापूर बाजार, कॅम्प) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे आहे. त्याच्याविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ एप्रिल २०२६ रोजी गुन्हे शाखा युनिट २ चे पथक हद्दीत गस्त घालत होते. यावेळी पोलीस हवालदार ओंकार कुंभार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, लष्कर पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील तडीपार आरोपी प्रथमेश रासगे हा फातिमा नगर येथील 'तंदूर हॉटेल' परिसरात थांबलेला आहे. मिळालेल्या माहितीची खात्री करून पोलिसांनी तातडीने तंदूर हॉटेल परिसरात सापळा रचला. यावेळी प्रथमेश रासगे तेथे दिसून येताच पथकाने त्याला शिताफीने ताब्यात घेतले. अधिक चौकशीदरम्यान तो तडीपारीच्या आदेशाचे उल्लंघन करून शहरात वावरत असल्याचे स्पष्ट झाले. आरोपी प्रथमेश रासगे याच्याविरुद्ध लष्कर पोलीस ठाण्यात शरीराविरुद्धचे एकूण ३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या वाढत्या गुन्हेगारी कारवायांमुळे पोलीस उपायुक्त, झोन-२ यांनी त्याला दोन वर्षांसाठी पुणे शहरातून तडीपार केले होते. मात्र, आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# एसटी आगारात पाणीटंचाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड येथील राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) आगारातील वर्कशॉपमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पाणीटंचाईची गंभीर समस्या निर्माण झाली असून, स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आल्याने कर्मचाऱ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे कामकाजावर परिणाम होत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

वल्लभनगर परिसरातील या आगारात सध्या सुमारे ५० एसटी बस कार्यरत आहेत. दररोज ३१ बस फेऱ्या येथून सुटतात आणि तेवढ्याच बस परत येतात. याशिवाय विविध आगारांमधील सुमारे ५५० बस दिवसभरात ये-जा करत असतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि देखभाल काम सुरू असताना वर्कशॉपमध्ये आवश्यक पाणीपुरवठा नसल्याने कर्मचाऱ्यांची मोठी अडचण होत आहे. वर्कशॉपमध्ये दररोज बसेसची तपासणी, दुरुस्ती आणि देखभाल केली जाते. मात्र, पाणीअभावी स्वच्छतागृह बंद असल्याने कर्मचाऱ्यांना सुमारे २०० ते ३०० मीटर अंतर चालत जाऊन चालक-वाहकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांचा वापर करावा लागत आहे. कर्मचाऱ्यांनी या समस्येबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. कामाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### बांध कोरल्याच्या वादातून हल्ला

**दौंड :** शेताच्या बांधावरून झालेल्या वादातून बाप-लेकावर कोयता व सत्तूरने हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना वाटलुज (ता. दौंड) येथे घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी दुपारी वाटलुज ग्रामपंचायत हद्दीत घडली. शेतकरी देविदास हिराजी शेंडगे (रा. वाटलुज, ता. दौंड) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेताचा बांध कोरल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आरोपींनी देविदास शेंडगे व त्यांच्या मुलावर कोयता व सत्तूरने हल्ला केला. तसेच "तुमची राजेगावसारखी अवस्था करू" अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी वैभव दादासो शेंडगे, सतीश भाऊसो शेंडगे आणि दादासो भाऊसो शेंडगे (सर्व रा. वाटलुज, ता. दौंड) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### लाथाबुक्क्यांनी शेतकऱ्याला मारहाण

**दौंड :** शेतात विनापरवाना कांद्याची साठवणूक का केली, असा जाब विचारल्याच्या रागातून एका ६५ वर्षीय शेतकऱ्यावर दगडाने तसेच लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केल्याची घटना काळेवाडी (ता. दौंड) परिसरात घडली. या प्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी काळेवाडी गावच्या हद्दीतील घडली. कल्याण तुकाराम माने (वय ६५, रा. हिंगणीबेर्डी माने वस्ती, ता. दौंड) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कांद्याच्या साठवणुकीवरून झालेल्या वादातून आरोपींनी माने यांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात माने गंभीर जखमी झाले. या प्रकरणी सुदाम प्रल्हाद ढवळे, प्रल्हाद कृष्णा ढवळे आणि वनिता सुदाम ढवळे (सर्व रा. विठ्ठलनगर, हिंगणीबेर्डी, ता. दौंड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास दौंड पोलीस करत आहेत.

### उपयुक्त पाणी २५.१८ टक्क्यांवर, टंचाईची भीती गडद

# उजनीचा साठा धोक्याच्या उंबरठ्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यातील महत्त्वाच्या जलस्रोतांपैकी एक असलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा झपाट्याने घटत असून, सध्या उपयुक्त साठा केवळ २५.१८ टक्क्यांवर आला आहे. साठ्याची ही घसरण कायम राहिल्यास धरण लवकरच 'मायनस' पातळीवर जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, त्यामुळे धरणग्रस्त भागातील शेतकरी व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दरवर्षी उन्हाळ्याच्या काळात पाणीटंचाईचा प्रश्न तीव्र स्वरूप धारण करतो. साधारणतः फेब्रुवारीपर्यंत धरणात समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध असतो; मात्र त्यानंतर पाण्याचा वापर वाढल्याने साठा झपाट्याने कमी होऊ लागतो. एप्रिल-मे महिन्यांत उपयुक्त साठा संपुष्टात येत धरण 'मायनस'मध्ये जाते आणि पाण्यासाठी गावागावांत मोठी धावपळ सुरू होते.

धरणग्रस्त गावांमध्ये दरवर्षी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते. शेतीसाठी पाणी अपुरे पडल्याने पिकांचे नुकसान होते, तर पिण्याच्या पाण्यासाठीही नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. यामुळे ग्रामीण भागातील जीवनमानावर गंभीर परिणाम होतो.

उजनी धरण हे पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी जीवनरेखा मानले जाते. त्यामुळे या धरणातील पाण्यावरून दरवर्षी दोन्ही जिल्ह्यांमध्ये राजकीय वादही निर्माण होतात. पाणीवाटपाचे नियोजन, कालव्यांमधील गळती, अनियंत्रित वापर आणि योग्य व्यवस्थापनाचा अभाव यामुळे टंचाईची समस्या अधिकच तीव्र होत असल्याची टीका स्थानिकांकडून होत आहे.

गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे धरण पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे यंदा पाणीटंचाईचा प्रश्न उद्भवणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. मात्र, सध्याची स्थिती पाहता ही अपेक्षा फोल ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. यंदाच्या पावसाचा अंदाजही समाधानकारक नसल्याने पुढील काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.

यापूर्वीच्या दुष्काळी परिस्थितीत या भागातील नागरिकांनी पाण्यासाठी प्रचंड हालअपेष्टा सोसल्या आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट, टँकरसाठी रांगा आणि शेतीचे मोठे नुकसान अशा अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. सध्याच्या घसरणाऱ्या पाणीसाठ्यामुळे पुन्हा तशीच वेळ येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तज्ज्ञांच्या मते, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, शेतीत सूक्ष्म सिंचन पद्धतींचा अवलंब करणे, तसेच पाणीवाटपाचे काटेकोर नियोजन करणे अत्यावश्यक आहे. प्रशासनानेही परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, उजनी धरणातील झपाट्याने कमी होणारा पाणीसाठा हा केवळ आकडेवारीपुरता प्रश्न नसून, ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती आणि जनजीवन यावर थेट परिणाम करणारा मुद्दा ठरत आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी व्यवस्थापन हा सर्वच स्तरांवर प्राधान्याचा विषय ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## आंबेगाव तालुक्यात डोंगरची 'काळी मैना' बाजारात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात डोंगराळ भागात नैसर्गिकरीत्या उगवणारी 'काळी मैना' म्हणून ओळखली जाणारी करवंदे सध्या बाजारात दाखल झाली असून या रानफळाला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गोड, आंबट आणि तुरट अशा वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे हे फळ लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्या पसंतीस उतरत आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत उपलब्ध होणाऱ्या या करवंदांचा आरोग्यदृष्ट्याही मोठा फायदा असल्याचे मानले जाते. शरीराला थंडावा देणारे आणि नैसर्गिक पोषक घटकांनी समृद्ध असल्याने ग्रामीण भागात 'काळी मैना'ला विशेष महत्त्व आहे. पारगावसह मंचर, घोडेगाव आदी तालुक्यातील बाजारपेठांमध्ये सध्या या फळाची आवक वाढली आहे. जुन्नर तालुक्यातील आदिवासी भाग तसेच माळशेज घाट परिसरातून ही करवंदे गोळा करून विक्रेते बाजारात आणत आहेत. यामुळे स्थानिकांना हंगामी रोजगाराची संधीही उपलब्ध होत आहे.

विशेषतः शालेय विद्यार्थी आणि युवक या रानफळाचा आनंद घेताना दिसत आहेत. करवंद विक्रेते मंगेश दुपारे यांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे यंदाही 'काळी मैना'ला चांगली मागणी असून उन्हाळ्यात या फळाची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. उन्हाळ्याच्या कडक उष्णतेत चव आणि आरोग्याचा संगम साधणारी 'काळी मैना' सध्या आंबेगाव तालुक्यातील बाजारपेठांची शोभा वाढवत आहे.

## उद्योजिका ज्योती गोरडे 'आंबेगाव भूषण स्वामी विवेकानंद उद्योजक पुरस्कारा'ने सन्मानित



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव) येथील मूळ रहिवासी व लोणी येथील उद्योजिका ज्योती अरुण गोरडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आंबेगाव तालुका; युगप्रवर्तक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य, घोडेगाव (ता. आंबेगाव); तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक व संविधान भवन समिती यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'आंबेगाव भूषण स्वामी विवेकानंद उद्योजक पुरस्कार' नुकताच प्रदान करण्यात आला.

या निमित्ताने मांदळेवाडी येथे श्री अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कार्यक्रमात ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सरपंच उज्वला अतुल आदक व उपसरपंच रवि ढगे पाटील यांच्या हस्ते ज्योती अरुण गोरडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भारतीय लष्करातून सेवा निवृत्त झालेले व नुकतीच पुणे शहर पोलीस दलात निवड झालेले प्रदीप आदक यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी बोलताना ज्योती गोरडे म्हणाल्या की, "आपल्या मातीतल्या माणसांनी केलेला हा सत्कार माझ्यासाठी आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आहे. या सन्मानामुळे उद्योग क्षेत्रात पुढे वाटचाल करण्यासाठी मला नवी ऊर्जा मिळेल."

यावेळी यात्रा कमिटीचे अध्यक्ष पै. विजय आदक, विकास आदक, रामदास पालेकर पाटील, पै. विश्वनाथ आदक, ज्ञानेश्वर मादळे, ॲड. अशोक पालेकर पाटील, पोलीस पाटील काळूराम पालेकर पाटील, सर्व भजनी मंडळाचे गायक-वादक, ग्रामस्थ तसेच विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## रांजणी ग्रामपंचायतीचा 'समृद्धीचा जागर'

### उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांगीण विकासाची दिशा साधली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांगीण विकासाची दिशा पकडली आहे. अभियानातील विविध निकषांवर प्रभावी अंमलबजावणी करत ग्रामपंचायतीने उच्चांक गाठला असून, नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे गावाच्या प्रगतीला वेग मिळाला आहे. या कामगिरीमुळे रांजणी ग्रामपंचायतीचा सर्वत्र कौतुकाने उल्लेख होत आहे.

अभियानाच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, जिल्हा परिषद सदस्या प्रीती थोरात, पंचायत समिती सदस्या प्रियंका वाघ तसेच गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज आदी मान्यवरांनी रांजणीला भेट दिली. यावेळी मान्यवरांनी ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. पारदर्शक प्रशासन, सुयोग्य नियोजन आणि लोकसहभागाच्या बळावर साधलेली प्रगती ही इतर गावांसाठी आदर्श ठरावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. या प्रसंगी सरपंच छाया बंडू वाघ व उपसरपंच मधुसूदन भोर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच ग्रामपंचायत सदस्य संतोष भोर, विजय वाघ, मनीषा भोर, प्रवीण थोरात, केतन वाघ, बंडेश वाघ, ग्रामपंचायत अधिकारी रूपाली देवडे यांच्यासह पंचायत समितीतील विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रांजणी ग्रामपंचायतीच्या या यशस्वी वाटचालीमुळे गावाच्या विकासाला नवे बळ मिळाले असून, भविष्यातही नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून समृद्धीचा ध्यास कायम ठेवण्याचा निर्धार ग्रामपंचायतीने व्यक्त केला आहे.

## आंबेगावात कांदा काढणी अंतिम टप्प्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या रब्बी हंगामातील कांदा काढणी अंतिम टप्प्यात आली आहे. यंदा उत्पादन चांगले झाले असले, तरी बाजारभाव समाधानकारक नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच लोखंडाच्या दरांनी गगनाला भिडल्याने कांदा साठवणुकीसाठी लागणाऱ्या पारंपरिक लोखंडी बराकी उभारणे अनेक शेतकऱ्यांना परवडत नसल्याचे चित्र आहे.

कांदा साठवण्यासाठी बराकी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. शेतकरी वर्षभर कांदा साठवून बाजारभाव वाढल्यानंतर विक्री करतात. मात्र, लोखंडी साहित्याच्या वाढलेल्या किमतींमुळे बराकी उभारणीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. यावर पर्याय म्हणून काही शेतकऱ्यांनी लाकडाच्या साहाय्याने बराकी उभारण्याचा पर्याय स्वीकारला आहे. कमी खर्चात साठवणूक करण्यासाठी हा पर्याय उपयोगी ठरत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. आंबेगाव तालुक्यातील चांडोली खुर्द येथील शेतकरी धोंडीभाऊ नामदेव इंदोरे यांनीही कांदा काढणीनंतर लाकडी बराकी तयार करून साठवणूक सुरू केली आहे. या पद्धतीमुळे खर्चात मोठी बचत होत असून, कांदा सुरक्षित ठेवणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून कांदा पिकाला अपेक्षित साथ मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव मात्र कमीच राहिल्याने शेतकऱ्यांचे गणित बिघडले आहे. अशा परिस्थितीत कमी खर्चातील उपाय म्हणून लाकडी बराकी हा पर्याय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही आंबेगाव तालुक्यात कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. मात्र, योग्य दर मिळाल्यासच शेतकऱ्यांना याचा खरा फायदा होणार आहे. त्यामुळे शासनाने कांद्याला हमीभाव देण्याबरोबरच साठवणुकीसाठी आवश्यक सुविधा व अनुदान उपलब्ध करून देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## यशोगाथा उत्तमापूरची अर्थात ओळख ओतूरची

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील प्राचीन उत्तमापूर अर्थात सध्याच्या ओतूर गावचा इतिहास, परंपरा आणि ७५ वर्षांचा प्रवास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने "यशोगाथा उत्तमापूरची अर्थात ओळख ओतूरची" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच ओतूर (ता. जुन्नर) येथे उत्साहात पार पडला.

ग्राम विकास मंडळ ओतूरचे माजी अध्यक्ष माधवराव डुंबरे यांच्या संकल्पनेतून या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. कार्यक्रमाला जुन्नर तालुक्यातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यावेळी माजी आमदार दिलीपराव ढमढेरे, माजी आमदार अतुल बेनके, माधवराव डुंबरे, हिराबाई डुंबरे, जि. प. सदस्या डॉ. छाया तांबे, पं. स. सदस्य प्रशांत डुंबरे, माजी जि. प. सदस्य मोहित ढमाले, पं. स. चे माजी सभापती विशाल तांबे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव चौगुले, शरद अण्णा चौधरी, रंगनाथ पाटील घोलप, ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे, श्री विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे, अनिल तांबे, पुणे जि. प. चे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे, सुजित खैरे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष तुषार थोरात, चैतन्य पतसंस्थेचे अध्यक्ष विनायक तांबे, ॲड. दिपक डुंबरे, वसंत डुंबरे, डॉ. रश्मी घोलप, शारदा डोंगरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पुस्तकातून ओतूर गावच्या इतिहासाचा, परंपरेचा आणि सामाजिक वाटचालीचा मागोवा घेण्यात आला असून ते नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## अवैध उत्खननाविरुद्ध कठोर भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात गौण खनिज वसुलीतून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असताना, अवैध उत्खनन आणि वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. मागील आर्थिक वर्षात वाळू, मुरूम, खडी यांसारख्या गौण खनिजांमधून तब्बल १८ कोटी ८१ लाख ६९ हजार ४५१ रुपयांचा महसूल जमा झाल्याची माहिती तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली.

तालुक्यात नैसर्गिक संसाधनांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने महसूल उत्पन्नात सातत्याने वाढ होत आहे. मात्र, याचबरोबर अवैध उत्खनन आणि अनधिकृत वाहतुकीचे प्रकारही वाढत असल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने तपासणी मोहीम राबवून कठोर कारवाईचा धडाका लावला आहे.

चालू आर्थिक वर्षात अवैध वाहतुकीच्या ६३ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असून, संबंधित वाहनांवर दंडात्मक कारवाई करत १ कोटी १५ लाख २७ हजार ९८५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. याशिवाय, गौण खनिज उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील ४२ प्रकरणांमध्ये तब्बल २७ कोटी रुपयांचा दंड थकीत असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणांवरील सुनावण्या पूर्ण झाल्यानंतरही दंड न भरलेल्या संबंधितांविरोधात महसूल विभागाने अधिक कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. संबंधितांच्या सातबारा उताऱ्यावर बोजा चढविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, त्यापैकी १४ प्रकरणांचा लिलाव लवकरच होणार आहे. या कारवाईमुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे महसूल वाढीस चालना मिळण्यासोबतच बेकायदेशीर उत्खननावर आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महसूल विभागाने पुढील काळातही अशा कारवाया अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

खेड तालुक्याने महसूल वसुलीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. मागील आर्थिक वर्षात ई-चावडी प्रणालीअंतर्गत १०० टक्के महसूल वसुली पूर्ण करत तालुक्याने पुणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे हा विक्रम शक्य झाल्याचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी नमूद केले.

### अधिकाऱ्यांना आमदार कटके यांचा इशारा

# शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष खपवून घेणार नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती :** शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे अधिकाऱ्यांनी प्राधान्याने लक्ष देणे अत्यावश्यक असून, दुर्लक्ष करणाऱ्यांची कोणत्याही परिस्थितीत गय केली जाणार नाही, असा इशारा आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी दिला. शासन शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिरूर येथे आयोजित तालुकास्तरीय खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस पंचायत समितीच्या सभापती स्वाती घावटे, उपसभापती रामभाऊ सासवडे, जिल्हा परिषद सदस्य प्रफुल्ल शिवले, दीपाली गव्हाणे, स्वाती पाचुंदकर, वृषाली वाळके, माजी सदस्या रेखा बांदल, राजेंद्र जगदाळे, दादा पाटील फराटे, नगरसेवक अभिजीत पाचर्णे, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, गटविकास अधिकारी महेश डोके, तालुका कृषी अधिकारी सुवर्णा आदक, महावितरणचे उपविभागीय अभियंता सुमित जाधव, बाळासाहेब घाडगे, नितीन थोरात, महेश ढमढेरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी आमदार कटके यांनी विविध शासकीय योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनामार्फत लवकरच नुकसानभरपाई देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

साकळाई पाणी योजनेच्या संदर्भात बोलताना त्यांनी स्पष्ट भूमिका मांडली. या योजनेला कोणत्याही परिस्थितीत पाणी देणार नसल्याचे त्यांनी सांगत, या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत संबंधित शेतकरी, लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची लवकरच बैठक आयोजित केली जाणार असल्याचे नमूद केले. या बैठकीत तोडगा न निघाल्यास शेतकऱ्यांसोबत आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला. खते व औषधांची गुणवत्ता तपासण्यासाठी शिरूर तालुक्यात प्रयोगशाळा उभारण्याचे प्रयत्न कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आर. आर. राठोड यांनी आभार मानले.

## जुन्नर मतदारसंघात एसआयआर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर विधानसभा मतदारसंघात आगामी 'मतदार यादी सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६'च्या अनुषंगाने मतदान नोंदणी अधिकारी पल्लवी घाडगे यांच्या अध्यक्षतेखाली मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षकांची महत्त्वपूर्ण बैठक दि. २१ एप्रिल रोजी पार पडली.

या बैठकीस तहसीलदार बाळासाहेब शिरसट, गटविकास अधिकारी प्रतीक चेन्नवार, तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले, निवडणूक नायब तहसीलदार ए. बी. गवारी तसेच गट शिक्षण अधिकारी अशोक लांडे उपस्थित होते. बैठकीची सुरुवात निवडणूक नायब तहसीलदार ए. बी. गवारी यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून मतदार यादीसंदर्भातील सुरू असलेल्या कामाचा सविस्तर आढावा सादर केला. मतदार नोंदणी प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पर्यवेक्षक व बीएलओंचा विशेष सत्कार करण्यात आला. यादीतील त्रुटी दूर करण्यावर भर देण्यात आला. यामध्ये अस्पष्ट (ब्लर) छायाचित्रे बदलणे, दुबार नावे वगळणे तसेच मयत मतदारांची नावे कमी करणे याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांनी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना कामकाज वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## सारांश वृत्त

### सर्वपक्षीय नेत्यांची पीडितांना श्रद्धांजली

**श्रीनगर:** गेल्या वर्षी पहलगाममध्ये लश्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार केलेल्या २६ जणांना सर्वपक्षीय राजकीय पक्षांनी बुधवारी श्रद्धांजली वाहिली. हा हल्ला एक अशी जखम आहे, जिचा व्रण कधीही पूर्णपणे भरणार नाही, असे त्यांनी म्हटले. "या दुःखद घटनेने केवळ आमची हृदयेच दुःखी केली नाहीत, तर आमच्या डोळ्यांत अश्रू आणले. यामुळे प्रत्येक काश्मिरीला दुःख झाले आहे," असे सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्सचे (एनसी) राज्य प्रवक्ते इम्रान नबी दार यांनी हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त सांगितले.

### अत्याचाराची आयोगाने घेतली दखल

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय महिला आयोगाने तामिळनाडूमध्ये १५ वर्षीय मुलीवर झालेल्या सामूहिक बलात्काराची स्वतःहून दखल घेतली असून, या घटनेला "भयानक" म्हटले आहे आणि अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी तामिळनाडूच्या पोलीस महासंचालकांना भारतीय न्याय संहिता आणि पॉक्सो कायद्यांतर्गत त्वरित एफआयआर नोंदवणे, सर्व आरोपींना तात्काळ अटक करणे आणि निष्पक्ष व कालमर्यादेत तपास सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

### इस्रायल भारताच्या पाठीशी उभा

**जेरुसलेम** : गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी झालेल्या आणि २६ जणांचा बळी घेणाऱ्या भ्याड पहलगाम हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त, इस्रायलने बुधवारी दहशतवादाविरुद्ध "त्याच्या सर्व स्वरूपांत" "निर्धाराने" लढण्याची शपथ घेत शोकाकुल भारतासोबत एकजूट व्यक्त केली. "पहलगाम दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, इस्रायल देशाच्या वतीने, आम्ही गमावलेल्या निष्पाप जीवांच्या स्मृतीस वंदन करतो आणि दुःखात त्यांच्या कुटुंबियांसोबत आहोत," असे इस्रायलचे परराष्ट्र मंत्री गिडियन सार यांनी एक्स वर लिहिले.


### अमेरिकी अध्यक्षांनी युद्धविरामात केली वाढ

# होर्मुझमधून इराणची जहाज जप्ती सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमधील तात्पुरता युद्धविराम वाढवला असतानाच, इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने बुधवारी होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडण्याचा प्रयत्न करणारी तीन जहाजे जप्त केल्याची घटना समोर आली आहे. आयआरजीसीने आज सकाळी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात दोन जहाजे जप्त केल्याची पुष्टी केली आहे.

"इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या नौदलाने आज सकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये नियमांचे उल्लंघन करणारी दोन जहाजे ओळखून थांबवली," असे गार्ड्सने म्हटले आहे. ही दोन्ही जहाजे आयआरजीसीच्या नौदलाने जप्त करून इराणी किनारपट्टीकडे वळवली. त्यापैकी एका जहाजाची ओळख "एमएससी-फ्रान्सेस्का"



अशी असून, ते इस्रायलच्या 'झायोनिस्ट राजवटीशी' संबंधित असल्याचा दावा करण्यात आला आहे. दुसरे जहाज "एपामिनोंडास" असल्याचे सांगण्यात आले असून, ते नेव्हिगेशन प्रणालीमध्ये फेरफार करून सागरी सुरक्षेला धोका निर्माण करत असल्याचा आरोप आहे.

दरम्यान, नूर न्यूज, फार्स आणि मेहर या इराणी वृत्तसंस्थांनी दिलेल्या वृत्तानुसार, आयआरजीसीने 'युफोरिया' नावाच्या तिसऱ्या जहाजावरही कारवाई केली आहे. हे जहाज इराणी किनाऱ्यावर 'अडकले' असल्याचे सांगण्यात आले, मात्र याबाबत अधिक तपशील देण्यात आलेला नाही.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संभाव्य वाटाघाटीपूर्वी तेहरानला एकसंध प्रस्ताव सादर करण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी इराणसोबतचा शस्त्रसंधी अनिश्चित काळासाठी वाढवला आहे. ही शस्त्रसंधी बुधवारी संपणार होती. मात्र, या निर्णयावर इराणने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. ब्रिटिश लष्कराच्या युनायटेड किंगडम मेरीटाइम ट्रेड ऑपरेशन्स (यूकेएमटीओ) केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, पहिली घटना सकाळी सुमारे ७:५५ वाजता घडली. ओमानच्या ईशान्येला सुमारे १५ सागरी मैलांवर एका कंटेनर जहाजावर गोळीबार करण्यात आला. या घटनेत जहाजाच्या ब्रिजचे मोठे नुकसान झाले असले, तरी सर्व कर्मचारी सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले आहे.

"एका कंटेनर जहाजाच्या कॅप्टनने माहिती दिली की, आयआरजीसीची एक गनबोट जहाजाजवळ आली आणि कोणताही इशारा न देता गोळीबार केला," असे यूकेएमटीओने स्पष्ट केले. या घटनेत आग लागल्याचे किंवा पर्यावरणीय हानी झाल्याचे वृत्त नाही. इराणने या हल्ल्याची अधिकृत कबुली दिलेली नसली, तरी नूर न्यूजने दिलेल्या माहितीनुसार, इराणी सशस्त्र दलांच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्यानंतरच ही कारवाई करण्यात आली. फार्स वृत्तसंस्थेने या घटनेचे वर्णन "होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण कायदेशीररित्या अंमलात आणण्यासाठी केलेली कारवाई" असे केले आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी शस्त्रसंधी वाढवली जाणार नसल्याचे संकेत दिले होते. मात्र, पाकिस्तानच्या विनंतीनंतर त्यांनी भूमिका बदलत शस्त्रसंधी वाढवण्याचा निर्णय घेतला. इराणकडून प्रस्ताव सादर होईपर्यंत अमेरिकेची नाकेबंदी सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## दहशतवादाचा सर्व प्रकारे पराभव करू : द्रौपदी मुर्मू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पीडितांना श्रद्धांजली अर्पण करत देशाचा दहशतवादाविरोधातील निर्धार पुन्हा अधोरेखित केला. "आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाचा पराभव करण्यासाठी कटिबद्ध आहोत," असा ठाम संदेश त्यांनी दिला.

'एक्स' या सामाजिक माध्यमावरील पोस्टमध्ये राष्ट्रपतींनी हल्ल्यातील निष्पाप बळींच्या कुटुंबीयांप्रति संवेदना व्यक्त केल्या. "त्या घृणास्पद कृत्यात झालेली जीवितहानी आपल्या सामूहिक स्मृतीत कायम राहील. संपूर्ण देश शोकाकुल कुटुंबांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. अशा दहशतवादी कृत्यांमुळे आपल्या शांतता आणि एकतेप्रती असलेली अढळ वचनबद्धता डगमगू शकत नाही," असे त्यांनी नमूद केले.

गेल्या वर्षी २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाकिस्तानस्थित



लष्कर-ए-तोयबा (एलईटी) या दहशतवादी संघटनेच्या तीन दहशतवाद्यांनी २५ पर्यटक आणि एका स्थानिक घोडावाल्याची निर्घृण हत्या केली होती. या हल्ल्याने देशभरात संतापाची लाट उसळली होती. यानंतर २८ जुलै रोजी श्रीनगरच्या उपनगरात 'ऑपरेशन महादेव' अंतर्गत सुरक्षा दलांनी चकमकीत तिन्ही दहशतवाद्यांचा खात्मा केला. हे दहशतवादी हल्ल्यानंतर दाचीगाम-हरवानच्या जंगलपट्ट्यात लपून बसले होते. भारतीय सशस्त्र दलांनी ७ मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. या कारवाईत लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या संघटनांच्या मुख्यालयांसह प्रशिक्षण केंद्रांना लक्ष्य करण्यात आले होते.

## काँग्रेसचा केंद्र सरकारवर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त काँग्रेसने बुधवारी केंद्रातील मोदी सरकारवर जोरदार टीका करत, पंतप्रधानांच्या परराष्ट्र धोरणाला "संपूर्ण अपयश" ठरवले. २६/११ च्या मुंबई हल्ल्यानंतर पाकिस्तान आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडले होते, मात्र आता त्याला पुन्हा "जागतिक प्रतिष्ठा" मिळत असल्याचा आरोप काँग्रेसने केला.

काँग्रेसचे संपर्क प्रभारी महासचिव जयराम रमेश यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले की, २२ एप्रिल हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी वेदना आणि दुःखाचा आहे. "नेमक्या वर्षभरापूर्वी पहलगाममध्ये पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी हल्ला झाला होता. आम्ही शोकाकुल कुटुंबियांसोबत आहोत. तसेच पर्यटकाला वाचवताना शहीद झालेल्या स्थानिक घोडागाडीवाल्याच्या शौर्याचेही स्मरण करतो," असे त्यांनी नमूद केले. रमेश यांनी दावा केला की, जम्मू-काश्मीरच्या नायब राज्यपालांनी ही गुप्तचर यंत्रणेची चूक असल्याचे मान्य केले होते. "काही महिन्यांत हल्लेखोरांचा बंदोबस्त करण्यात आला असला, तरी या कबुलीवर नेमकी काय कारवाई झाली, हे स्पष्ट नाही," असे त्यांनी म्हटले.

ते म्हणाले की, नोव्हेंबर २००८ मधील मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान आंतरराष्ट्रीय पातळीवर अलग पडले होते. "आजही पाकिस्तानची अर्थव्यवस्था कमकुवत आहे, राजकीय अस्थिरता आहे आणि लष्कराचा प्रभाव कायम आहे. तरीही त्याला नव्याने जागतिक मान्यता मिळत आहे," असा आरोप त्यांनी केला.

"हे सर्व पंतप्रधानांच्या परराष्ट्र धोरणाच्या गाभ्याचे अपयश असून त्यांच्या आत्मस्तुतीपर राजनैतिक शैलीचे द्योतक आहे," अशी टीकाही त्यांनी केली. परराष्ट्र धोरणात बदल करण्याची गरज व्यक्त केली.

## उष्णतेची लाट तीव्र होणार; आयएमडीचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) देशातील अनेक भागांमध्ये पुढील चार ते पाच दिवसांत उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याचा इशारा दिला आहे. विशेषतः वायव्य, मध्य आणि पूर्व भारतातील राज्यांमध्ये तापमानात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

आयएमडीने बुधवारी जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार, पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीतील काही भागांमध्ये २४ आणि २५ एप्रिल रोजी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तसेच पश्चिम उत्तर प्रदेशात २३



ते २५ एप्रिलदरम्यान, तर पूर्व उत्तर प्रदेशात २२ ते २६ एप्रिलदरम्यान उष्णतेचा प्रकोप कायम राहू शकतो. राजस्थानमध्ये २४ ते २६ एप्रिलदरम्यान, तर मध्य प्रदेशात २३ ते २६ एप्रिलदरम्यान उष्णतेची लाट जाणवण्याचा अंदाज आहे. याशिवाय विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये २४ ते २७ एप्रिलदरम्यान उष्णतेचा फटका बसण्याची शक्यता आहे. गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्ये २२ व २३ एप्रिल रोजी उष्णतेची तीव्रता वाढू शकते.

उष्णतेबरोबरच काही किनारपट्टी भागांमध्ये उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे. २२ ते २५ एप्रिलदरम्यान ओडिशा, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश, यानम, गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगाल, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल, केरळ, माहे तसेच किनारपट्टीवरील कर्नाटक आणि गुजरातच्या काही भागांमध्ये उकाडा आणि आर्द्रता वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच हरियाणा, चंदीगड, दिल्ली, ओडिशा आणि कोकण-गोव्यातील काही भागांमध्ये रात्रीचे तापमानही उबदार राहण्याची शक्यता असून, नागरिकांना उष्णतेचा अधिक त्रास जाणवू शकतो. याउलट, ईशान्य आणि पूर्व भारतातील काही भागांना पावसाचा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## डीएमकेकडून ८ हजार रुपयांचे कूपन वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : भारतीय निवडणूक आयोगाने (ईसीआय) मंगळवारी मद्रास उच्च न्यायालयाला माहिती दिली की, द्रमुक पक्षाकडून "८,००० रुपयांचे कूपन" वाटप केल्याच्या आरोपांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, पोलिसांनी या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवले आहेत. तसेच संबंधितांवर पुढील कारवाई सुरू असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले.

एआयएडीएमकेचे वकील आर.ए.एस. सेंथिलवेल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीदरम्यान, ईसीआयचे स्थायी वकील निरंजन राजगोपालन यांनी सरन्यायाधीश सुश्रुत अरविंद धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती जी. अरुल मुरुगन यांच्या खंडपीठासमोर ही माहिती मांडली.

आयोगाच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, या प्रकरणी संबंधित पक्षाला कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली आहे. याची नोंद घेत खंडपीठाने याचिका निकाली काढली. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, द्रमुक पक्षाने कोईम्बतूर दक्षिण, बरगुर, पालकोड, कुंभकोणम आणि अण्णा नगर या विधानसभा मतदारसंघांतील मतदारांना ८,००० रुपयांचे कूपन वितरित केले. द्रमुकच्या सूत्रांनी मात्र यापूर्वी स्पष्ट केले होते की, हे कूपन प्रत्यक्ष लाभ देणारे नसून 'इल्लाथरसी योजना' कशी राबवली जाईल, याचे प्रातिनिधिक स्वरूप दाखवण्यासाठी वितरित करण्यात आले होते. तथापि, याचिकाकर्त्याने दावा केला की, या कूपनवर विशिष्ट अनुक्रमांक होते आणि काही ठिकाणी ते वैयक्तिक मतदारांच्या नावावर जारी करण्यात आले होते. तसेच टेलिव्हिजन आणि वॉशिंग मशीनसारख्या वस्तूंसाठी पसंती नोंदवण्याचे तपशीलही त्यासोबत जोडलेले होते.

### टीएमसी निवडणूक आयोगाकडे दाद मागणार

## भाजपकडून रेल्वेचा गैरवापर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : राज्य विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यापूर्वीच्या ४८ तासांच्या शांततेच्या काळात भाजपने सुरत ते पश्चिम बंगाल विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था केल्याचा आरोप करत तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) बुधवारी भाजपविरोधात तक्रार दाखल केली असून, निवडणूक आयोगाकडून कठोर कारवाईची मागणी केली आहे.

पश्चिम बंगालच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात, टीएमसी खासदार डेरेक ओ'ब्रायन यांनी दावा केला आहे की, भाजपने आणि त्यांच्या गुजरात युनिटने मतदानासाठी परतणाऱ्या स्थलांतरित मजुरांसाठी विशेष रेल्वे सेवांची सोय केली होती. त्यांनी असा आरोप केला की, या व्यवस्थेमध्ये मोफत प्रवास तसेच भोजन आणि अल्पोपाहाराचा समावेश होता आणि हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन आहे.

ओ'ब्रायन यांनी 'एक्स' वरील एका पोस्टचा हवाला दिला, ज्यामध्ये सुटणाऱ्या ट्रेनचा व्हिडिओ होता आणि त्यात पश्चिम बंगालमध्ये मतदारांना



नेण्यासाठी भाजप-समर्थित व्यवस्था दाखवण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. तक्रारीनुसार, त्या पोस्टमध्ये असे सुचवण्यात आले होते की, गुजरात भाजपचे सदस्य प्रवाशांसोबत होते आणि त्यांना टीएमसीच्या विरोधात मतदान करण्याचे आवाहन करत होते.

टीएमसी नेत्याने असा युक्तिवाद केला की, भारतीय रेल्वे केंद्र सरकारच्या अखत्यारीत असल्याने तिचा वापर राजकीय हेतूंसाठी केला जाऊ शकत नाही. त्यांनी पुढे असा आरोप केला की, ही व्यवस्था म्हणजे सरकारी मालकीच्या संसाधनांचा गैरवापर असून त्यामुळे भाजपला निवडणुकीत अयोग्य फायदा मिळत आहे. या तक्रारीत या कृतीला मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या आणि निवडणुकीच्या निकालांवर फेरफार करण्याच्या उद्देशाने केलेला प्रचार म्हटले आहे. त्यात असेही नमूद केले आहे की, जरी भाजपने हा खर्च खाजगीरित्या उचलला असता, तरीही निवडणुकीदरम्यान मतदारांना मोफत वाहतूक आणि संबंधित सेवा पुरवणे हे निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघनच ठरले असते.

ओ'ब्रायन यांनी असा आरोप केला की, कथित व्यवस्था या लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१ अंतर्गत अनेक "भ्रष्ट प्रथा" दर्शवतात. त्यांनी लाचखोरी, अवाजवी प्रभाव आणि मतदारांची अवैध वाहतूक यासंबंधीच्या तरतुदींचा हवाला देत असा युक्तिवाद केला की, या कृतींमुळे मतदानाच्या हक्कांच्या मुक्त वापरात हस्तक्षेप झाला. त्या पत्रात भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या तरतुदींचाही संदर्भ देण्यात आला असून, निवडणुकीदरम्यान अवाजवी प्रभाव टाकणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र गुन्हा असल्याचा आरोप करण्यात आला आहे. टीएमसीने निवडणूक आयोगाला भाजप आणि त्यांच्या सदस्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे, कायदेशीर कारवाई सुरू करण्याचे आवाहन केले आहे.

## मध्य प्रदेशात आणखी एक वाघ मृत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भोपाळ** : मध्य प्रदेशातील पन्ना व्याघ्र प्रकल्पात एका वाघाचा सांगाडा सापडल्याने गस्ती व्यवस्थेतील त्रुटींविषयी गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. २००८-०९ दरम्यान मोठ्या प्रमाणावर शिकार आणि गैरव्यवस्थापनामुळे या प्रकल्पात वाघ स्थानिक पातळीवर नामशेष झाले होते. या पार्श्वभूमीवर सद्य घटना पुन्हा एकदा जुन्या समस्यांकडे लक्ष वेधणारी ठरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी पन्ना व्याघ्र प्रकल्पातील गंगाऊ वन्यजीव अभयारण्यात महुआची फुले गोळा करण्यासाठी गेलेल्या एका गावकऱ्याला वाघाच्या सांगाड्याचे अवशेष आढळले. सांगाड्याच्या अवस्थेवरून मृत्यू सुमारे २० ते २५ दिवसांपूर्वी झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

हे अवशेष कटारिया वनक्षेत्रातील मुख्य रस्त्यापासून सुमारे १०० ते २०० मीटर अंतरावर आढळल्याने गस्ती पथकांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. "मृतदेह उशिरा सापडणे ही चिंताजनक बाब असून गस्त अधिक प्रभावी आणि सतर्क असणे गरजेचे आहे," असे वन विभागाच्या एका माजी अधिकाऱ्याने सांगितले.

पन्ना व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक बृजेश श्रीवास्तव यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय पथक आणि इतर कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. "राज्य व्याघ्र शोध पथक (एसटीएसएफ) या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे. प्राथमिक अहवालांच्या आधारे मृत्यूचे कारण आणि वाघाची ओळख निश्चित करण्यात येईल," असे त्यांनी स्पष्ट केले.

तपासातील सूत्रांनुसार, सापडलेला सांगाडा ३ ते ५ वर्षे वयोगटातील एका नर वाघाचा असावा. महत्त्वाचे म्हणजे, शरीराचे मुख्य अवयव शाबूत असल्याने शिकार झाल्याची शक्यता कमी असून नैसर्गिक मृत्यूची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, अंतिम निष्कर्ष न्यायवैद्यक तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, मध्य प्रदेशात यावर्षी आतापर्यंत २० वाघांच्या मृत्यूची नोंद झाली असून, 'व्याघ्र राज्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात ही चिंतेची बाब मानली जात आहे.

## ब्रिटिश नागरिकावर ईडीचे आरोपपत्र

**नवी दिल्ली** : अंमलबारी संचालनालयाने (ईडी) बुधवारी सांगितले की, मोझांबिक, ब्राझील आणि इंडोनेशियामधील कंपनीच्या तेल आणि वायू मालमत्तांना वित्तपुरवठा करण्याशी संबंधित व्हिडिओकॉन ग्रुपविरुद्धच्या बँक कर्ज घोटाळा आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणात ब्रिटिश नागरिकाविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. स्विस कंपनी एनहोल्डिंग्ज एसएचे अध्यक्ष आणि निव्हिओ टेक्नॉलॉजीज व इंजिनिअर. एआयचे लाभधारक मालक सचिन देव दुग्गल यांचे नाव आहे.

## युरोपीय युनियनकडून निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त युरोपियन युनियन (ईयू) आणि इंग्लंडने हल्ल्याचा तीव्र निषेध करत भारतातील जनतेप्रती सहानुभूती व्यक्त केली.

२७ सदस्य राष्ट्रांचा समावेश असलेल्या युरोपियन युनियनने अधिकृत निवेदनात हल्ल्यातील निष्पाप बळींना श्रद्धांजली अर्पण केली. "पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या स्मृतीदिनी, एक वर्षापूर्वी हत्या झालेल्या निष्पाप बळींच्या स्मरणार्थ युरोपियन युनियन आणि तिचे २७ सदस्य देश भारताच्या लोकांसोबत एकजुटीने उभे आहेत," असे निवेदनात म्हटले आहे. तसेच, "पीडितांच्या कुटुंबीयांसोबत आणि भारतीय प्रशासनासोबत आम्ही त्यांच्या स्मृतीला आदरपूर्वक अभिवादन करतो. दहशतवादाच्या कोणत्याही स्वरूपाचे समर्थन होऊ शकत नाही," असे स्पष्ट करत ईयूने सर्व प्रकारच्या दहशतवादाचा पुनरुच्चार केला. नवी दिल्लीतील ब्रिटिश उच्चायुक्तालयानेही सोशल मीडियावर निवेदन जारी करत हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहिली. "आज पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष पूर्ण होत आहे. आम्ही पीडितांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि या घटनेमुळे प्रभावित सर्वांसोबत आमच्या संवेदना आहेत," असे त्यात नमूद करण्यात आले. दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा निषेध करत शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याची गरज इंग्लंडने व्यक्त केली आहे.

### दहशतवादी हल्ल्यातील २६ बळींना आदरांजली

# पहलगाममध्ये 'बैसरन शहीद स्मारक' उभारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पहलगाम** : पहलगाम येथील भीषण दहशतवादी हल्ल्याच्या पहिल्या वर्षपूर्तीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने बैसरन येथे हल्ल्यातील पीडितांच्या स्मरणार्थ 'बैसरन शहीद स्मारक' उभारले आहे.

या स्मारकाद्वारे २५ पर्यटक आणि एका स्थानिक पोनीवाल्यासह एकूण २६ बळींना आदरांजली वाहण्यात आली आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन कुरणात लश्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला होता. या हल्ल्यात २५ पर्यटकांसह स्थानिक




पोनीवाला सय्यद आदिल हुसेन शाह यांचा मृत्यू झाला होता. शाह यांनी हल्लेखोरांकडील रायफल हिसकावण्याचा प्रयत्न करताना प्राण दिले होते.

या घटनेच्या चिरस्मरणासाठी पहलगाम विकास प्राधिकरणाने उभारलेल्या स्मारकाच्या माथ्यावर दोन भारतीय ध्वज लावण्यात आले असून, काळ्या संगमरवरावर सर्व २६ बळींची नावे ठळक सोनेरी अक्षरांत कोरलेली आहेत. स्मारक परिसरात येणारे पर्यटक येथे थांबून प्रार्थना करत आदरांजली अर्पण करत आहेत.

या हल्ल्यानंतर काश्मीरच्या पर्यटनावर मोठा परिणाम झाला होता. हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय लष्कराने ७ मे २०२५ रोजी 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर कारवाई केली होती. त्यानंतर २८ जुलै २०२५ रोजी श्रीनगरजवळील दाचीगाम वनक्षेत्रात 'ऑपरेशन महादेव' दरम्यान या हल्ल्यातील तीन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले.

दरम्यान, देशभरातून येणारे पर्यटक या स्मारकाला भेट देत आहेत. लखनौचे पर्यटक संत सिंग यांनी "हे स्मारक पीडितांच्या आठवणी जपणारे आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी योग्य ठिकाण आहे," असे मत व्यक्त केले. तर मध्य प्रदेशातील डॉ. अखिलेश तिवारी यांनी "सरकारने या घटनेला विसरले नाही, हे या स्मारकातून स्पष्ट होते," असे सांगितले.

स्थानिक नागरिकही पर्यटकांना या स्मारकाला भेट देण्यास प्रोत्साहित करत असून, हा हल्ला आणि त्यातील वेदना संपूर्ण काश्मीरच्या सामूहिक स्मृतीचा भाग बनल्याचे दिसून येत आहे. हे स्मारक दुःख, धैर्य आणि जिद्दीचे प्रतीक म्हणून उभे राहिले आहे.